प्रकरण ४ :

# राष्ट्रीय हित आणि राष्ट्रीय सत्ता

# National Interest and National Power

*** प्रस्तावना :**

आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रीय हिताच्या तत्त्वास अनन्य साधारण महत्त्व आहे. राष्ट्रीय हितास परराष्ट्र धोरणाचा आत्मा म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर परराष्ट्र धोरणाचे यश आणि अपयश राष्ट्रीय हितावरच अवलंबून असते. जगातील कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हित साधण्यात सफल झाले तर राष्ट्रीय हिताचे संरक्षण करण्यात यशस्वी झाले असे मानण्यात येते. जर हे राष्ट्रीय हित संरक्षण करण्यास असमर्थ ठरले तर त्यास अपयशी परराष्ट्र धोरण म्हटले जाते. संपूर्ण आंतरराष्ट्रीय राजकारण राष्ट्रीय हित या संकल्पनेभोवती फिरत असते. राष्ट्रीय हित समोर ठेवूनच प्रत्येक राष्ट्र परराष्ट्र धोरणाची दिशा ठरवीत असते. मॉर्गेन्थाने राष्ट्रीय हितास एक प्रकारची शक्ती मानले आहे.

*** राष्ट्रीय हित : अर्थ व स्वरूप :**

प्राचीन काळापासून राष्ट्रीय हितास सर्वच राष्ट्रांनी एक महत्त्वपूर्ण घटक मानले आहे. राष्ट्रीय हितावरच प्रत्येक राष्ट्राची विदेश नीती कार्यरत असते. ही बाब आधुनिक स्वरूपाची नसून ती अतिप्राचीन आहे. पूर्वीच्या काळात राजेशाही अस्तित्वात असल्याने त्यास राजाची इच्छा म्हटले जात होते. नंतरच्या काळात अनेक बदल झाले राजेशाही संपुष्टात येऊन लोकशाही शासन व्यवस्था सर्वत्र नावारूपास आली. प्रत्येक राष्ट्र राष्ट्रीय हिताचा वापर करताना लोकांच्या व्यापक हिताचाही विचार करू लागले. या बाबतीत लॉर्ड मारस्टन असे मत विशद करतो की, "ब्रिटनला कोणीही कायम मित्र नाही, कोणीही कायम शत्रू नाही तर ब्रिटनच्या सोबत फक्त राष्ट्रीय हितसंबंध आहे." या विचारावरून असे स्पष्ट होते की, ज्या राष्ट्राने राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिलेल्या राष्ट्राचा विकासही होतो आणि त्या राष्ट्रातील शासन व्यवस्था नेहमी स्थिर राहते. संपूर्ण जगासमोर तो एक आदर्श असतो.

राष्ट्रीय हितसंबंध साधत असताना राज्याच्या कोणत्याही कृतीचे समर्थन केले जाते. कृती चांगली असेल अथवा वाईट असेल याचा विचार केला जात नाही. उद्देश मात्र एकच असतो आणि तो म्हणजे राष्ट्रीय हित. राष्ट्रीय हितासाठी जे रा

साम, दाम, दंड आणि भेद याचा वापर करते त्या राष्ट्राचे वर्चस्व आणि दबदबा कायम राहतो. हा आजपर्यंतचा इतिहास आहे. म्हणूनच प्रत्येक राष्ट्र आपल्या कुवतीनुसार राष्ट्रीय हितास प्राधान्य देत असते. रशियावर आक्रमण करताना नेपोलियन म्हणाला होता की, "मी हे पाऊल टाकले आहे ते फक्त फ्रान्सच्या राष्ट्रीय हितासाठी त्यापेक्षा माझा दुसरा कोणताही उद्देश नाही." जनतेचा त्यास पाठिंबा म्हणजेच कृती कोणतीही असो उद्देश एकच आणि तो म्हणजे राष्ट्रीय हित, राष्ट्रीय हित संबंध नेहमीच प्रवाहासारखे बदलणारे असतात. त्यात परिस्थितीनुसार कायम बदल होत असतात. आणि हे बदल नेहमीच स्वीकारले जातात.

राष्ट्रीय हितसंबंध अबाधित राहण्यासाठी आधुनिक युगात जनतेच्या पाठिंब्याची आवश्यकता असते. यासाठी राजकीय मुत्सद्दी जनतेच्या भावनिक मुद्याला हात घालून जनतेचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. ते या प्रयत्नांत यशस्वीही होतात.

आंतरराष्ट्रीय राजकारणात भाग घेणारे सर्वच देश आपल्या कार्याचे संचालन ज्या नीतीद्वारे आणि सिद्धांताद्वारे करतात त्यास राष्ट्रीय हित असे म्हणतात. इ. स. १९४७ मध्ये लोकसभेत भाषण करताना पंडित जवाहरलाल नेहरुनी असे म्हटले होते की, "कोणत्याही देशाच्या विदेश नीतीचा आधार त्यांच्या राष्ट्रीय हिताची सुरक्षा आहे. भारताच्या विदेशी नीतीचे ध्येयदेखील राष्ट्रीय हिताची सुरक्षाच आहे."

*** राष्ट्रीय हिताची व्याख्या :**

१) **जोसेफ फ्रँकेल :** "एखाद्या राष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणाचा जो पायाभूत सिद्धांत किंवा तत्त्व असते त्यास राष्ट्रीय हितसंबंध असे म्हणतात" त्यांनी ही व्याख्या 'नॅशनल इन्टरेस्ट' या ग्रंथात स्पष्ट केली आहे.

२) **रेमां आरो :** 'राष्ट्रीय हित ही संकल्पना एवढी अस्पष्ट आणि अर्थहीन आहे की, यास जास्तीत -जास्त देखाव्याची धारणा म्हटले जाते."

३) **पैडलफोर्ड आणि लिंकन :** "राष्ट्रीय हिताची संकल्पना समाजाच्या मूलभूत मूल्यांशी जोडलली आहे. राष्ट्राचे कल्याण, राजकीय विश्वासांचे संरक्षण, राष्ट्रीय जीवन पद्धती, प्रादेशिक अखंडत्व तसेच सीमारेषांची सुरक्षा या सर्वाचा सार म्हणजे राष्ट्रीय हित होय."

४) **वॉन डिक :** "दुसऱ्या देशांबरोबर संबंध प्रस्थापित करण्यासाठी अथवा अस्तित्वात आणलेल्या संबंधांच्या सुरक्षिततेसाठी राज्याने ठरविलेले उद्दिष्ट म्हणजे राष्ट्रीय हितसंबंध होय."

५ ) **चार्ल्स लर्च अथवा अब्दुल सईद :** "राष्ट्रीय हित म्हणजे भविष्यातील दीर्घ मुदतीची आणि सर्वसामान्य ध्येय प्राप्तीसाठी राष्ट्र राज्य आणि सरकार जी कृती करतात ती कृती म्हणजेच राष्ट्रीय हित होय."

*** राष्ट्रीय हितसंबंधांची वैशिष्ट्ये :**

दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रीय हितास अतिशय महत्त्व प्राप्त झाले. जागतिक स्तरावर अनेक राष्ट्रे नव्याने स्वतंत्र झाली. प्रत्येक राष्ट्रात स्वतःच्या राज्यघटना अस्तित्वात आल्या. राष्ट्रवादाची कल्पना अधिक प्रभावी बनत गेली. आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वच राष्ट्रांत आपल्या राष्ट्राविषयी अभिमान निर्माण झाला. अशा बदलांमुळे प्रत्येक राष्ट्र राष्ट्रीय हितास जास्तीत जास्त प्राधान्य देऊ लागले. राष्ट्रीय हिताची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

१ ) **परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हिताचा केंद्रबिंदू :** आंतरराष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण हे त्या संबंधित राष्ट्राच्या हितसंबंधांवर आधारलले असते. मॉगेन्थॉच्या मते, "राष्ट्रीय हितात दोन तत्त्वे अंतर्भूत केलेली असतात. पहिले तत्त्व म्हणजे तात्त्विक दृष्टीने राष्ट्र हिताची कल्पना योग्य म्हणून आवश्यक आहे. दुसरे तत्त्व म्हणजे राष्ट्रीय हित हे अस्थिर असून ते परिस्थितीनुसार निश्चित केले जात असते. प्रत्येक राष्ट्र परराष्ट्र धोरण आखत असताना राष्ट्रीय हितास अधिक प्राधान्य देते. त्यामुळेच परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हिताच केंद्रबिंदू आहे असे मानले जाते.

२ ) **राष्ट्राची क्षमता :** राष्ट्रीय हित ही संकल्पना राष्ट्राच्या क्षमतेशी निगडित आहे. कोणत्याही राष्ट्राची नैसर्गिक साधनसंपत्ती, लष्करी सामर्थ्य, कार्यक्षम लोकसंख्या स्थिर शासन, राष्ट्राभिमान, प्रचंड असेल तर ते राष्ट्र आपल्या क्षमतेच्या जोरावर राष्ट्रीय हितही चांगल्या प्रकारे साध्य करून घेत असते. आज चीनने आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःला समर्थ बनविले आहे. त्यामुळे चीनची क्षमता वाढली आहे. या वाढलेल्या क्षमतेमुळे चीनने स्वतःचे राष्ट्रीय हित साधून जागतिक स्तरावर आपला दबदबा कायम केला आहे. सोव्हियत रशियाचे विभाजन झाल्यामुळे त्यांची क्षमता कमी झाली आहे.

३ ) **परिस्थितीनुसार बदल :** आंतरराष्ट्रीय पातळीवर दीर्घकाळ कोणी कोणाचा मित्र अथवा शत्रू राहू शकत नाही. यात नेहमी बदल होत असतात. त्याचप्रमाणे राष्ट्रीय हितात देखील परिस्थितीनुसार बदल होत असतात. अमेरिकेत सुरुवातील चीनला प्रखर विरोध केला. परंतु चीनची शक्ती वाढल्याबरोबर रशियाची ताकद

कमी करण्यासाठी अमेरिकेने चीनला मदत केली. असे बदल ते आंतरराष्ट्रीय पा... ...ण युद्ध ...रणात वेळोवेळी बघायला मिळतात.

४) **संरक्षण :** राष्ट्रीय हित या संकल्पनेत राष्ट्राचा संरक्षणास सर्वोच्च स्थान प्राप्त करून दिले जाते. यंत्रयुगाच्या जोरावर प्रत्येक राष्ट्राने मोठी प्रगती केली आहे. प्रत्येक राष्ट्राने लष्करी सामर्थ्य वाढविण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भीतीयुक्त वातावरण निर्माण झालेले दिसते. त्यासाठी प्रत्येक राष्ट्र राष्ट्रीय संरक्षणास प्राधान्य देत आहे. पाकिस्तानातील राजकीय नेत्यांनी वेळोवेळी असे म्हटले आहे की, "वेळप्रसंगी आमच्याकडे भाकरी नसली तर आम्ही गवत खाऊ पण राष्ट्राचे संरक्षण करण्यास आम्ही मागे हटणार नाही." राष्ट्रीय सुरक्षितता या तत्त्वात कोणतेही राष्ट्र बदल करत नाही.

५) **वास्तवतेस प्राधान्य :** राष्ट्रीय हितसंबंधांत नेहमीच वास्तविक बाबींना महत्त्व दिले जाते. स्वप्नाळु आणि आदर्शवादी विचारांवर विश्वास ठेवला जात नाही. जगातील प्रत्येक राष्ट्र आपल्या ताकदीच्या जोरावर वास्तविकता समोर ठेवून राष्ट्रीय हितसंबंधांची पायाभरणी करीत असते.

*** राष्ट्रीय हितसंबंधांचे प्रकार : Kinds of National Interest :**

थॉमस रॉबिन्सन या विचारवंताने राष्ट्रीय हिताचे सहा प्रकार सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे –

**१) प्राथमिक हितसंबंध ( Primary Interests ) :** प्राथमिक हितसंबंध राज्याच्या दृष्टिकोनातून सर्वात महत्त्वपूर्ण मानले जाते. ज्यांच्या संरक्षणासाठी राज्य सर्वात मोठे बलिदान आणि त्याग करण्यासाठी सदा-सर्वदा तयार असते. राष्ट्राचे संरक्षण करणे हे प्राथमिक हितसंबंधाचे महत्त्वपूर्ण कार्य आहे.

**२) दुय्यम हितसंबंध ( Secondary Interests ) :** प्राथमिक हितसंबंधांपेक्षा या हितसंबंधास कमी महत्त्व आहे. तरीसुद्धा राज्याची सत्ता अबाधित ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. या हितसंबंधांमार्फत विदेशांतील आपले नागरिक आणि राजदूत यांच्या हितांचे संरक्षण करण्याचे काम केले जाते.

**३) स्थायी हितसंबंध ( Permanent Interests ) :** स्थायी स्वरूपाच्या हितसंबंधांना खूप महत्त्व आहे. या संबंधांमार्फत राज्याचे अस्तित्व नेहमी टिकवून ठेवले जाते. दीर्घकालीन लक्ष्य प्राप्त करणे या प्रकाराचे उद्दिष्ट असते. भारताने कायमस्वरूपी आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार करून आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे.

४) परिवर्तनीय हितसंबंध ( Variable Interest ) : परिवर्तनीय [हितसं]बंध परिस्थितीनुसार सतत बदलत असतात. हा बदल कधी कधी जनमताचा [आ]धार घेऊनदेखील केला जात असतो. राजकीय मुत्सद्यांच्या विचारांचा देखील यावर प्रभाव असतो.

५) सामान्य हितसंबंध ( Common Interest ) : सामान्य प्रकारच्या राष्ट्रीय हितसंबंधांत राष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व्यापारावर व बाजारपेठांवर लक्ष केंद्रित केले जाते. यासाठी पोषक असे वातावरण निर्माण केले जाते. इंग्लंडने या प्रकारचे धोरण आखून युरोप खंडात सत्ता संतुलन निर्माण करण्याचे काम केले होते.

६) विशिष्ट हितसंबंध : सामान्य हितसंबंधांतून विशिष्ट हितसंबंधांची निर्मिती होत असते. युरोप खंडात सत्ता संतुलन निर्माण करणे हे यात इंग्लंडचे हित होते. बेल्जियम आणि हॉलंडवर कोणीही आपले प्रभुत्व निर्माण करू नये म्हणून इंग्लंड नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे, कारण नेपोलियन बोनापार्टने हॉलंडवर आणि बेल्जियमवर आपले वर्चस्व सिद्ध केले असले तर त्यांनी इंग्लंडवर आक्रमण केले असते. म्हणून ही दोन्ही राष्ट्रे तटस्थ राहीली पाहिजेत ही इंग्लंडची खेळी होती. आधुनिक युगात अनेक राष्ट्रे दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी विशेष हितसंबंध निर्माण करण्यासाठी एकत्र येत आहेत.

*** राष्ट्रीय हितसंबंधांचे प्रमुख साधने :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांच्या राष्ट्रीय हितसंबंधांत नेहमीच विरोध आणि संघर्ष पाहावयास मिळत असतो. भारत आणि पाकिस्तान, अमेरिका आणि रशिया, जर्मनी आणि फ्रान्स, अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंध नेहमीच प्रतिकूल दिसून आले आहेत, प्रत्येक राष्ट्र हे संबंध अनुकूल करण्यासाठी प्रयत्नशील असते परंतु काही राष्ट्रांच्या बेरकीपणाने वागण्यामुळे यात यश प्राप्त होत नाही. कौटिल्याने या संदर्भात असे म्हटले आहे की, "दुर्बल राजांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करणे आवश्यकता वाटल्यास त्याला काही देऊन संबंध अनुकूल केले पाहिजेत परंतु जो राजा सबल आहे त्यास भेद आणि दंडाद्वारे वशमध्ये केले पाहिजे." राष्ट्रीय हितसंबंधांची प्रमुख साधने पुढीलप्रमाणे –

१) मुत्सद्देगिरी / राजनय ( Diploacy ) : प्राचीन काळापासून ते आजपर्यंत राष्ट्राचे हित सुरक्षित ठेवण्याचे व त्यात वाढ करण्याचे साधन म्हणून राजनयाकडे बघितले जाते. राजनय म्हणजे असे साधन की ज्याद्वारे एक राज्य वेगवेगळ्या राज्यांशी संबंध स्थापित करीत असते. राजनय जेव्हा अपयशी होतो,

तेव्हाच युद्ध अटळ बनते, राजनयाचे महत्त्व युद्ध सुरू होण्यापूर्वी ही आणि युद्ध संपुष्टात आल्यानंतरही असते, आजच्या आधुनिक युगात आंतरराष्ट्रीय राजकारणात राजनयाचे स्थान अधिक महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

**२) आर्थिक साधन ( Economic Instruments of National Policy ) :** आंतरराष्ट्रीय पातळीवर आज आर्थिक साधन महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. पूर्वीच्या काळात लष्करी सामर्थ्याच्या जोरावर हवी ती बाब प्राप्त करता येत होती. आज परिस्थितीत बदल झाले आहेत. आर्थिक साधनांच्या जोरावर आज सत्तेची सूत्रे फिरत आहेत. आर्थिक साधने ज्या राष्ट्राकडे उपलब्ध आहेत, तिचा पुरेपुर उपयोग करून देशातील लोकांचे राहणीमान वाढविणे हे अर्थातच त्या देशाच्या कार्यक्षमतेवर, शास्त्रीय संशोधनावर आणि उद्योगधंद्यांच्या वाढीवर अवलंबून असते. राष्ट्रीय हितात आर्थिक साधन महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. अमेरिकेने आर्थिक साधनांच्या जोरावर राष्ट्रीय साधून जगावर राज्य करण्याचे धोरण अवलंबिले आहे.

**३) साम्राज्यवाद आणि वसाहतवाद ( Imperialism and Colonialism ) :** आद्योगिक क्रांती उदयास आल्यानंतर विविध देशांच्या बाजारपेठा काबीज करण्यासाठी वसाहतवादाचा पुरस्कार केला गेला, युरोपातील इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, पोर्तुगाल हे देश वसाहतवादाचा स्पर्धेत उतरले. पुढे वसाहतवादाचे रूपांतर साम्राज्यवादात झाले. वसाहतवादात व्यापारी हितसंबंधांपुरते असलेले संबंध विस्तारीत करून स्वतःच्या राष्ट्रीय हितासाठी अनेक देशांनी मागासलेल्या देशांची पिळवणूक केली. पूर्वी वसाहतवाद आर्थिक, सामाजिक व धार्मीक स्वरूपाचा होता. आधुनिक काळातील साम्राज्यवाद व वसाहतवाद हा आर्थिक बाबींवर आधारलेला आहे. आज काही बलाढ्य राष्ट्रे या साधनांचा पुरेपूर वापर करून राष्ट्रीय हित साध्य करण्याचा प्रयत्न अहोरात्र करीत आहेत. उदा. अमेरिका, चीन व जपान.

**४) युद्ध ( War as an Instrument of National Policy ) :** स्वतःच्या राष्ट्राचे हित साध्य करण्यासाठी प्राचीन काळापासून ते आजपर्यंत अनेक राष्ट्रांनी युद्धाचा मार्ग अवलंबिला आहे. राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबरोबर युद्ध पुकारणे पूर्वीच्या काळी सामर्थ्याचे लक्षण समजले जात होते. युद्धाच्या माध्यमातून युद्धखोर राष्ट्र आपल्या राष्ट्राचे राष्ट्रीय हित साध्य करीत आले आहे. अमेरिकेनेदेखिल अलीकडील काळात इराकसारख्या राष्ट्रावर आक्रमण करून स्वतःच्या राष्ट्राचे हित साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. रूसोच्या मते, "युद्ध म्हणजे राज्याच्या शक्तीचे परीक्षण होय." आजच्या काळात युद्धाची पद्धती

आधुनिक काळात राष्ट्रीय हितासाठीं युद्धखोर प्रवृत्ती बळावत आहे. बदलेली आहे. युद्धात प्रत्यक्ष न गुंतलेली राष्ट्रे मित्रराष्ट्रे या नात्याने अशा युद्धखोर राष्ट्रांना मदत करून आपले राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. युद्ध हे राष्ट्रीय हित साध्य करण्याचे पूर्वीपासून एक प्रभावी साधन मानले जाते. आजही ह्या साधनाचे महत्त्व कमी झालेले दिसत नाही.

**५ ) जागतिक हितसंबंधांच्या आधारे राष्ट्रीय हित :** जागतिक पातळीवरील प्रत्येक राष्ट्राचे ध्येय आपले राष्ट्रीय हित साध्य करणे हेच असते. याबरोबरच आर-ए-फॉक आणि एस. एच. मेंडलोव्हिज यांच्या मते काही आंतरराष्ट्रीय प्रश्नांतून राष्ट्रीय हितसंबंध आकार घेत असतात, उदा, युद्ध, गरिबी, दारिद्य, वांशिक पेचप्रसंग, आणि वसाहतवाद इत्यादी, त्याचबरोबर जागतिक स्तरावरील संघटनांची काही ध्येय, धोरणे असतात त्यातू राष्ट्रीय हितसंबंध उदयास येत असतात, उदा. संघर्षाचा बीमोड करणे, सर्वांगीण विकास साधने, शांतता आणि सुरक्षितता, शस्त्ररूपात युद्धाला विरोध वसाहतवादाला व साम्राज्यवादाला विरोध अशी उद्दिष्टे समोर ठेवून राष्ट्रीय हितसंबंध साधण्याचा प्रयत्न केला जातो.

**※ राष्ट्रीय हितसंबंध आणि परराष्ट्र धोरण परस्पर संबंध :**

राष्ट्रीय हित आणि परराष्ट्र धोरण यांचा फार जवळचा संबंध आहे. परराष्ट्र धोरणाचा यशस्वितेवरच राष्ट्रीय हिताचा पाया मजबूत केला जातो. कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण हे स्थायी स्वरूपाचे नसते. त्यात कालमानानुसार सतत बदल होत असतात, राज्यबाहेरील देशांत प्रभाव निर्माण करण्यासाठी राष्ट्रांनी केलेल्या प्रयत्नांचा तो गाभा असतो. या धोरणात एक प्रकारची गतिशीलता असली तरी विविध राष्ट्रांच्या धोरणांचा व घेतलेल्या निर्णयांचा विशिष्ट राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांवर परिणाम घडून येणे संभाव्य असते. परराष्ट्र धोरणाचे अग्रगण्य उद्दिष्ट राष्ट्रीय हित साधणे हेच असते व ते साध्य करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले जातात, राष्ट्रीय हिताची संकल्पना परराष्ट्र धोरणाचा मूलभूत सिद्धांत आहे.

विल्सन नावाचा आदर्शवादी विचारवंताने असे म्हटले आहे की, "परराष्ट्र धोरणाचा राष्ट्रीय हित या संकल्पनेच्या आधारावर निर्मिती होणे एक घातक बाब आहे. परराष्ट्र धोरणातील क्षेत्रात नैतिकता आणि उपयोगिता आमचे मार्गदर्शक असले पाहिजे, त्यात कोणताही स्वार्थ असू नये." मॉर्गेन्था ने असे म्हटले अहे की, राष्ट्रीय हित परराष्ट्र धोरणाचा आत्मा आहे, परराष्ट्र धोरणाचा सार (Substance) आहे,

हीच प्रेरणा आणि आधारशिला आहे, राष्ट्रीय हित परराष्ट्र धोरणाची कुण्डली आहे, तसेच सर्वश्रेष्ठ तत्त्वांचा गाभा आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधांत परराष्ट्र धोरणाचे संचालन राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने केले जाते. अनेक वर्षांपासून पररराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हितास प्राधान्य दिले जात आहे. वेळ आणि परिस्थितीनुसार राष्ट्रीय हिताची जी मागणी आहे. त्यास अनुसरून परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट आखले जाते. यातही राष्ट्रीय हिताचा क्रम ठरवावा लागतो. राष्ट्रीय हितात प्राथमिक हितांचे रक्षण सर्वात अगोदर केले जाते. तर दुय्यम हिताचे रक्षण नंतर केले जाते. काही अशा प्रकारचे हित असतात त्यांचे संरक्षण कुठल्याही परिस्थितीत करावेच लागते. राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन करताना आपल्या परराष्ट्र धोरणाचा मार्ग निश्चित केला पाहिजे.

आजच्या आधुनिक युगात प्रत्येक राज्याचे राष्ट्रीय हित त्यांच्या परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार सतत बदलत असते. पण राज्याने कमीत-कमी खालील तीन बाबींच्या आधारे परराष्ट्र धोरणांची अंमलबजावणी केली पाहिजे.

**१ ) आत्मरक्षण ( Self Preservation ) :**

आत्मरक्षण म्हणजे प्रत्येक राष्ट्राने आपले सार्वभौमत्व आणि अखंडत्व टिकवून ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील असले पाहिजे.

**२ ) संरक्षण ( Security ) :** राज्याने बाह्य आक्रमणापासून आपल्या जनतेचे संरक्षण केले पाहिजे, त्यांच्या जीविताला धोका निर्माण न होता त्यांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले पाहिजे.

**३ ) लोककल्याण ( Welfare of the Nation ) :** राज्याने जनतेच्या कल्याणासाठी विविध योजनांची निर्मिती करून त्यांच्या जीवनात सुख आणि समृद्धी आणली पाहिजे.

परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय हित या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रत्येक राष्ट्र परराष्ट्र धोरण आखत असताना आपले राष्ट्रीय हित कसे साधले जाईल यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असते. आजच्या या स्पर्धेच्या युगात तर दिवसेंदिवस राष्ट्रीय हितास अतिशय महत्त्व प्राप्त होत आहे.